# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission

क्र : मविनिआ/माअअ/३७/२०१६/००१९०    दि. ०९.०५.२०१६

प्रति,
श्री. गुरुप्रसाद शेट्टी,
बी-२, श्रीराम इंडस्ट्रियल इस्टेट,
जी. डी. आंबेकर मार्ग,
वडाला, मुंबई ४०० ०३१.

**विषय :- आपला दि. २९.०३.२०१६ रोजीचा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अर्ज.**

महोदय,

आपला दि. २९.०३.२०१६ रोजीचा माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ६ (१) प्रमाणे केलेला अर्ज आयोगाच्या कार्यालयास दि. ०४.०४.२०१६ रोजी प्राप्त झालेला आहे.

सदर अर्जात आपण उपस्थित केलेल्या माहितीस अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, दि. २०.०४.२०१६ रोजी दुपारी ०३.३० वाजता आयोगाच्या कार्यालयातून मी स्वत: जनमाहिती आधिकारी आणि श्री. रविंद्र सोनावणे, उपसंचालक (विधी) यांनी आपल्याशी भ्रमणध्वनीद्वारे केलेल्या संभाषणातून आपणांस असे कळविले की, आपणांस हवी असलेली माहिती आयोगाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. त्यानुसार आपण श्री. सोनावणे, उपसंचालक (विधी) यांना सांगितले की, मला हवी असलेली माहिती आपल्या आयोगाच्या संकेतस्थळावरुन उतरवून घेईल. सबब, मी जो अर्ज माहितीच्या आधारे या कार्यालयास सादर केलेला आहे तो अर्ज रद्द करावा. त्याबाबत आपल्या कार्यालयास ईमेलद्वारे किंवा पत्राद्वारे कळविण्यात येईल असे भ्रमणध्वनी वरुन सांगितले.

परंतू, आपला माहितीचा अर्ज रद्द करण्यासाठी आपल्याकडून या कार्यालयास अद्याप कोणताही अर्ज किंवा ईमेल प्राप्त झालेला नाही. यास्तव, आपणांस कळविण्यात येते की, कृपया आपणांस आवश्यक असलेली माहिती संकेतस्थळावरुन उपलब्ध झाली असल्यास कळवावे. अन्यथा, याव्यतिरिक्त आपणांस आणखी काही माहिती हवी असल्यास आपण माहितीचा अधिकार अंतर्गत दुसरा नवीन अर्ज सादर करुन उपलब्ध करु शकता.

उपरोक्त दिलेली माहितीबद्दल आपले समाधान न झाल्यास आपण प्रथम अपीलीय अधिकारी श्री.अनिलकुमार उके, उपसंचालक (विधी), महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई यांचेकडे सदर पत्र प्राप्त झाल्यापासून ३० दिवसाच्या आत अपीलीय अधिकारी यांचेकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

आपला विश्वासू,

(प्रदीप मोहरे)
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
13th Floor, Centre No. 1, World Trade Centre, Cuffe Parade, Colaba, Mumbai - 400 005.
**Tel.:** 022-2216 3964 / 2216 3965 / 2216 3969 **Fax :** 022-2216 3976
**E-mail :** mercindia@merc.gov.in / mercindia@mercindia.org.in **Website :** www.merc.gov.in / www.mercindia.org.in